१९८३
म. ग्रं. सं. ठाणें
विषय काव्य
सं. क्र. १५८८




REFBK-0013493
REFBK-0013493

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत.
अनुक्रम ३४४५८ वि: काव्य
[illegible] १५४८८ नों. दि. १४.३.६३

# धून

(काव्य-संग्रह)

१३४९३
क्र. क्र.

'गणपत पाटोळे.'

REFBK-0013493
REFBK-0013493

दोन रुपये

-: प्रमुख विक्रेते :-

कॉन्टिनेन्टल बुक सर्व्हिस

अप्पा बळवंत चौक, पुणें २.

: प्रकाशक :

सौ. सरोज पाटोळे,
मिलिंद प्रकाशन –
२५५ घोरपडे, पुणें २.

चित्रकारः– अ. दि. कोकड.
बुधवार, पुणें २

: मुद्रक :

ना. अ. मेहेंदळे
जीवन मुद्रणालय,
५५१ बुधवार, पुणें २.

पितृवत् ति. काकांचे चरणीं

(श्री. त्रिंबक गोपाळ जोशी,
पिलीवकर वकील, पंढरपूर)

-: सादर अर्पण :-

## हृद्गत :

नवजात बालकाप्रमाणें माझ्या कवितांवर मराठींतील मातबर कवींच्या रुपा-गुणांची छाप क्वचित् पडली असेल तर त्यांत गैर असं कांहींच नाहीं –

'गंगेच जल गंगेलाच समर्पण' या न्यायानंच काव्यरूपी हें अर्घ्य मी श्रद्धेनं काव्यगंगेला अर्पण करीत आहे एवढंच ! यांत नवीन असं कांहींच नाहीं –

सकाळचे संपादक श्री. मो. स. साठे व माझे मित्र श्री. रा. पं. देशपांडे यांच्या प्रोत्साहनामुळेंच केवळ मी कांहीं लिहूं शकलो – अन्यथा अशक्य ! प्राध्यापक श्री. ग. प्र. प्रधान यांनीं अगदीं आपुलकीच्या भावनेनें, कामाच्या भाऊगर्दींतून बहुमोल वेळ काढून दिलेल्या मौलिक प्रस्तावनेचें मोल शब्दातीत आहे. त्याबद्दल मी त्यांचा सदैव ऋणी आहें.

प्रकाशनाचे बाबतींत श्री. गो. गं. पारखी, श्री. रामचंद्र हिंगणे, श्री. दत्ता टोळ व श्री. रमेश सुळे यांचे श्रम मोलाचे आहेत. माझे चित्रकार मित्र श्री. अ. दि. कोकड व मुद्रक श्री. व्ही. जी. मेहेंदळे यांच्या सहकार्याशिवाय तर कांहींच झालं नसतं.

रसिक वाचक क्षणमात्र जरी 'धून' वाचून धुंद झाला तरी श्रमाचं सार्थक झालं असं मी समजेन.

मकर संक्रांत
१४ जानेवारी १९६३

गणपत पाटोळे

# अनुक्रम :—


धून
खुळा
हुरहुर
अुगाच कुठवर
गवत वाळले
मी बसते तेथून
ओसाडाच्या वाटचाला
या तारका
पहांट वेडीं
तुझा गुलाब
ग्वाही
खुषींत वेगळया
भ्रांत
तूं नसतांना
संगत धरूं नकोस
येत असावी
अवघडलेली
बदल
अुदास वासना
राधेला लाज वाटुंदे
मांजर काळे
भरलेल्या गेही
कळत नकळत
अज्ञात वाट
बघतां बघतां
भरारी
तुला पहावें
चाड
फुलली आशा
प्रीत
जगावेगळीं
अुगा लाजली
कशासाठीं
माथ्यावरती
वारा लागला वहाया
तुझ्या स्मृतीचा
अेकच वाट
माझेपण विसरुन जातो
मिचकावीत मज
सुस्त माळ
कधिकधि
आज
दुःखामध्यें सुख अेक
गाभाऱ्यांत
रोज पहातो
खंत
कधि अेकांती
सरली दौलत मदनाची
चालेल
अर्ध्या रात्रीं
अुगा हंसतें आकाश
कोडी
अेकादा दिवस
अुगाचच
पहांट
जरी कांठ
गीत
पाणवठ्यावर
अेक चित्र
काय कल
जावूं कसा
माझी मला कविता


● ● ●

# प्रस्तावना

कविता लिहिणाऱ्या सर्वांना आपण 'कवी' म्हणून संबोधीत असलों तरी प्रत्येक कवीच्या भावजीवनांत कवितेला वेगळें स्थान असतें. कांहीं कवींचें भावजीवन त्यांच्या कवितेनेंच व्यापलेलें असतें. हीं छांदिष्ट, झपाटलेलीं माणसें आपल्याला आत्मकेन्द्रित वाटतात, पण असे कवीच जगाला वेड लावणाऱ्या कविता लिहूं शकतात. याच्या उलट असेही कांहीं कवि असतात कीं ज्यांना जीवनांतील सौंदर्य सर्वसामान्य माणसा-इतकेंच जाणवलेलें असतें परंतु त्यांना कविता लिहिणें या गोष्टीचाच हव्यास असतो. अशा कवींच्या कविता वेळीं अवेळीं वाचाव्या व ऐकाव्या लागणें ही एक शिक्षाच असते. परंतु या दोन वर्गांहून निराळा असाही एक कवींचा वर्ग असतो, कीं ज्या कवींच्या मनाला भावसौंदर्याप्रमाणेंच भाषेच्या सौंदर्याचेंहि आकर्षण वाटत असतें. त्यांच्या मनांत जे आल्हाद-दायक भावतरंग फुटतात ते तरंग सहृदय वाचकांप्रत समर्पक शब्दांच्या

सहाय्यानें पोंचवावे अशी अंतरीची ओढ त्यांच्या मनाला वाटत असते. या ओढीमुळेंच ते मधून मधून कविता लिहितात. भावनांचा हा आविष्कार करतांना त्यांना स्वतःची ओळख पटत जाते, व शब्दांत अनुभव व्यक्त करण्याचें त्यांचें सामर्थ्यहि हळूंहळू वाढत असतें. या कवितेनें या कवींचें सर्व भावविश्व व्यापलेलें नसलें तरी त्यांच्या जीवनाचा तो अत्यंत पवित्र व सुंदर असा भाग असतो. एखाद्या मोठ्या वाड्यांत सुंदर देवघर असावें त्याप्रमाणें त्यांच्या जीवनांत काव्यदेवतेला स्थान मिळालेलें असतें. त्यांची काव्यदेवतेची उपासना पाहणेंहि मोठें विलोभनीय असतें. माझे मित्र श्री. पाटोळे हे या वर्गांतीलच कवी आहेत आणि त्यांच्या काव्योपासनेंतील निष्ठा, उत्कटता आणि सौंदर्य मी जवळून पाहिलेलें आहे. त्यांच्या या काव्यसंग्रहांतून त्यांच्या रसिक, सौंदर्यप्रेमी मनाचा परिचय वाचकांना खासच होईल.

'माझेंपण विसरून जातो' या कवितेंत कवीनें आपल्या मनाचें यथातथ्य वर्णन केलें आहे.

'इंद्रधनूचा गोफ पहातां
मीं माझें पण विसरून जातो
स्वतःच होवून इंद्रधनू मग
त्या रंगानें रंगुन जातो.'

जीवनांतील विविध तऱ्हेचें सौंदर्य पाहतांना, अनुभवतांना, कवी त्यांत कसा एकरूप होतो व त्याचें भान कसें हरपतें हें या कवितेंत व्यक्त झालें आहे आणि अन्य कविता वाचीत असतांना हीच भावस्थिती प्रगट झाली आहे. कवीचें मन सहजपणेंच कांहीं सौंदर्यकण कसे टिपून घेतें हें 'एखादा दिवस' या कवितेंत अगदीं निरागसपणानें आविष्कृत झालें आहे. 'एखादी लकेर अशी येते, कानांतच रुतून बसते' या ओळीवर भाष्य करण्याची कांहीं आवश्यकता नाहीं.

श्री. पाटोळे यांची प्रकृति चिंतनशील आहे. त्यामुळें एखाद्या अनुभवाचें धुंद वर्णन करण्याचें सामर्थ्य त्यांच्या कवितेंत नाहीं, पण विरहार्त

मनाचा संयमित उद्गार मात्र त्यांच्या कवितेंत जागोजाग विखुरला आहे. मात्र आनंदाची गोष्ट ही कीं या विरही मनांतील भावनेला अकारण उदार स्वरूप देण्याचा त्यांनीं प्रयत्न केलेला नाहीं. मनांतील काहुराचें त्यांनीं मनमोकळेपणानें वर्णन केलेलें आहे.

‘ तुझ्या स्मृतीचा
    हिरवा चांफा
अवचित फुलतो
    मनांत माझ्या !
अन् वासनेचा
    भुजंग काळा
फणा काढितो
    पुन्हां पुन्हां !

निसर्ग हा काव्याचा चिरंतन विषय आहे. श्री. पाटोळे यांनींहि निसर्गावर कविता लिहिल्या आहेत. परंतु त्या कविता अनुकरणवृत्तीनें लिहिलेल्या नाहींत. मानवी मनांतील भावना निसर्गातहि असाव्यात असें श्री. पाटोळे यांना वाटतें. ‘ दुःखामध्यें सुख एक ’ या कवितेंत ‘ बिचारी सांज भेदरली आहे, तिला गाफिल पाहून दिवस निघून गेला आहे आणि या वंचनेनंतर काळोख वाढत असतांना मनांत दाटणारें दुःख केवळ पृथ्वीच्या सोबतीमुळें सुसह्य होत आहे ’ अशी कल्पना मांडली आहे. मात्र कल्पनेच्या आहारीं जाऊन या ‘ भावनांचा आरोप ’ श्री. पाटोळे यांनीं अतिरिक्त होऊं दिलेला नाहीं.

श्री. पाटोळे यांच्या कवितेंतील एक दोष म्हणजे कांहीं वेळां सांकेतिक कल्पना व प्रमिता यांचा हव्यास त्यांच्या मनाला वाटतो. त्यांच्या प्रेमविषयक कवितांतील राधेचा उल्लेख व कांहीं वेळां निसर्गाचा केलेला उल्लेखही सांकेतिक वाटतात. अर्थात् काव्यरचनेच्या सुरवातीच्या अवस्थेंत हा दोष थोड्या फार प्रमाणांत असतोच. श्री. पाटोळे यांना नवनवीन कविता लिहितांना ‘ स्वत्व गवसलें ’ तर हा दोष नाहींसा होऊं शकेल.

श्रीं. पाटोळे यांच्या कवितेला छंद, वृत्त, जाति यांचें बंधन नाहीं. मला असें वाटतें कीं प्रमत्त प्रतिभेच्या मुक्त आविष्काराला छंदाचा अडथळा होऊं नये हें खरें असलें, तरी सौम्य प्रतिभेच्या संयमपूर्ण आविष्काराला घाट येण्यासाठीं छंदाची मदत होते. शब्दयोजना व काव्यरचना या बाबतींत नव्या कवीनें सहजस्फूर्त आविष्कारापेक्षां जाणीवपूर्वक सौंदर्यशिल्प–निर्मितीचा अवलंब करावा हेंच उचित.

श्री. पाटोळे यांची सौंदर्यप्रेमी वृत्ति अधिकाधिक बहरत जावो हीच एक वाचक म्हणून, माझी अपेक्षा आहे.

ग. प्र. प्रधान

# धून

फुलाच्या मनांत
कोमल कोशांत
सुगंधी कळ
        ठणकत आहे !

वाऱ्याच्या मनांत
लखलख तेजांत
अेक स्फुलिंग
        जळत आहे !

नदीच्या मनांत
वहात्या जळांत
शीतळ दु:ख
        झिरपत आहे !

वाऱ्याच्या मनांत
खोल अुरांत
अून पोकळी
        कढत आहे !

कोकिळेच्या मनांत
आर्त गानांत
अेक अेक तान
        विरहाची धून आहे !!

• • •

९३४०३
मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थलप्रत.
वि.
अनुक्रमांक ........ नों. दि. ........

## खुळा !

गुलाब फुलले
गालीं हसले
    कसे हुंगुं समजेना !

अधरीं अमृत
वितरे अविरत
    कसें सेवुं उमगेना !

नयनीं भरली
प्रीती-बोली
    कशी जाणुं उकलेना !

अभिनव चाळे
यौवन खेळे
    खुळा ! अर्थ लागेना !!

• • •

## हुरहुर

कुणि माझा कान्हा
द्वारकेचा राणा
पंढरीचा राया
देखियला ?

झांकाळून नेत्र
सखा जादूगार
झाला दृष्टीपार
मोहिनीनें !

बावरी मी राधा
मज प्रीत बाधा
मुरलीच्या नादा
आसावले !

कानीं येत सूर
वाटे हुरहूर
अंतरीं काहूर
अुगाच तें !

धांवते फसते
अंतरी रडते
मन वेडावतें
मला माझें !

अंवती भवती
असुनी भरुनी
का न डोळां मूर्ती
सांवळी ती ?

● ● ●

## उगाच कुठवर ?

अुगाच कुठवर वाऱ्यावरतो
सांजसकाळीं सखे फिरावें
फिरुनी फिरुनी थकुनी जातां
विकल मनानें मी परतावें !

अुगाच कुठवर ताऱ्यांवरती
नजर रोखुनी सखे बसावें
थकुनी जातां नेत्र खुळे मग
तुझ्या चिंतनीं मिटुनी घ्यावे !

अुगाच कुठवर सांग फुलांना
मी हुंगावे मी चुंबावे
विफल भावना होता माझी
मनोमनी तुज मी चुंबावें !

अुगाच कुठवर गान अैकुनी
निर्झरणीचें सांग रमावें
रस हीनता ध्यानीं येता
भावगीत तव मी आळवावें !

अुगाच कुठवर असें जगावें
असें झुरावें असें मरावें
तव शब्दावर विसंबुनी ग
जीवन माझें मी गमवावें !!

• • •

# गवत वाळले !

गवत वाळले अन् मेलेले
निपचित खातें मार अुन्हाचा
आग मनींची मनांत जाळुन
वरवर हंसते वाऱ्याशीं त्या !

गवत वाळले टक लावुनी
सदा पहाते नील नभाला
नजर अधाशी बघुनी त्याची
ओशाळत नभ मनांत अपुल्या !

गवत वाळले हरकुन जाते
बघुनि अकाशीं मेघ सांवळा
व्यथित परंतु निष्ठुर वारा
नेतो वाहुन निष्फळ आशा !

गवत वाळले 'घांस' होवुनी
कुणा जिवाच्या मुखांत जातां
मुक्तच केले जीवनांतुनी
म्हणे जाहलो धन्य आतां !

• • •

## मी बसते तेथून

कधि कधि
मी बसते तेथून
दिसते मजला
अंगणांतली
जुअी फुललेली
मुसमुसलेली !

अन् लपेटून मग
घेते रजअी
कृश मी माझ्या
देहाभंवती
मृत मी माझ्या
वासना सभोंती !!

• • •

## ओसाडाच्या वांट्याला

ओसाडाच्या वांट्याला
आले निवडुंगाचे पीक,
त्याच्या संगतींत वेडा
जगतो भकास जीवन ...

कधि खुरट्या छायेंत
अुंच रचतो मनोरे,
शिरीं कांटेरी फडांचा
मुगुट दिसतो शोभून !

• • •

## या तारका ! --

" पाहील ना कुणी ! – "
" असु देत ग,
त्या तर तारा आकाशीच्या !"
" परि सांगा मजला
कशा जन्मल्या "
प्रश्न तुझा लटका ! —

" कुणी जादुगर चुंबुन गेला
या रात्रीला लाख ठिकाणी . . .
ओठावरती गालावरती
आणि कुंतली ! . . .
आणिक तयांची
झाली सुमने
या तारका !
ही नक्षत्रें !! "

• • •

## पहांट वेडी –

कार्तिकांतली पहांट वेडी
कधींची होती अवघडलेली
कणाकणांतुन भरली होती
हुडहुडणारी अवखळ थंडी !

कधीच वारा होता पडला
दिमाख अुसना होता सरला
दाट धुक्याची घेवुन वाकळ
निजल्या होत्या दिशा चोरट्या !

कळींकळींतुन पाझरणारा
सुगंध वेडा होता थिजला
चमचमणाऱ्या चटक चांदण्या
फिक्या पांढऱ्या हिरमुसलेल्या !

गीत रात्रिचे होते सरले
निजली होती अजुनी दुनिया
मधुनी मधुनी पहात होती
पहांट वेडी परि पूर्वेला !!

● ● ●

## तुझा गुलाब

निघालीस तूं
तेव्हां होता
रक्त तांबडा
गुलाब फुलला;
तलम पाकळ्या
तरळत होत्या
वायूवरती
मंद मंद त्या !

परतलीस तूं
तेव्हां होता
रंग तयांचा
गे विटलेला
कितिक पाकळ्या
गळल्या होत्या
अन् विरहानें
हिरमुसलेला !!

• • •

मराठी ग्रंथ संग्रहालय
दा. क्र. 93४९3

## ग्वाही

दुडुम् दुडुम् वाजवा चौघडा
निनाद होवुं द्या
खाली वरती चहुं बाजूला
स्वर्गाला भिडुं द्या

तळमळणारे आत्मे तेथिल
अैकुन जयनाद
स्वातंत्र्याचा – बोलूं लागतिल
जय जय जय हिंद !

आनंदाने अश्रूंचे मग
वाहतील पाट
थेंबाथेंबातुन जन्मतील
शांतीचे दूत !

जयनादाचे ध्वनि अुमटतील
दरी दरींतून
ब्रम्हांडाचा गोलही अैकुन
डोलूं लागेल !

" मानव्याचा जन्म जाहला
अंधारांतुन "
ज्याच्या त्याच्या अंतरातुन
स्फुरतील हे बोल !

दुडुम् दुडुम् वाजवोनी ग्वाही
चराचराला द्या
मानवतेचे अन् समतेचे
राष्ट्र येओ उदया !!

• • •

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थलप्रत.
अनुक्रम ३६४८८ वि. क्र.
आवक ९५८८ नों. दि. २८-२-५२

## खुषींत वेगळ्या !–

गुबगुबीत नी
शुभ्र मुलायम . . .
दोन कराची
दोन कबुतरे . . .
टिपीत असतां
लोंकर धागे
कला कुसरी
पुनः पुन्हां ते–

मन वेडे माझे
नकळत बसले
गुंतुन तेथें . . .
निळ्या आकाशीं
त्या धाग्याच्या
अुबींत तसल्या
खुषींत वेगळ्या !!

• • •

# भ्रांत

असार संसार
ठावुक असून
बळेच मांडला
        प्रपंचाचा डाव !

वाढे वंश वेल
बघुनी संतुष्ट
घेती निद्रासुख
        सुखें मायबाप !

रात्रंदिन मात्र
तडफडे जीव
दुपारची भ्रांत
        जाळते सतत !!

• • •

# तूं नसतांना

तूं असतांना
नको वाटती . . .
लगट तुझी ती
तसली भलती !

तूं नसतांना
अनुभवते परी
कणाकणानें
त्याची गोडी !!

• • •

# संगत धरूं नकोस

फुलाची संगत
धरूं नकोस,
त्याचा सुगंध
वाऱ्यावर उडुन जाईल,
पाकळ्या नकळत
गळुन पडतील,

अन्

देठच फक्त
शिल्लक राहील !

तारांशीं दोस्ती
करूं नकोस
त्यांचं तेज
लुप्त होईल
त्या नकळत
गडप होतील

अन्

काळोखच फक्त
शिल्लक राहील !

वाऱ्याशीं मैत्री
करूं नकोस,
तो कांहीं काळ
तालावर नाचील

पण लहर येतांच
निघुन जाईल

अन्

तल्खलीच फक्त
शिल्लक राहील !

आकाशाशीं नातं
जोडुं नकोस
ते दुरुनच तुला
झुलवील

अन्

हें अफाट अंतर
असच छळत राहील !!

• • •

# येत असावी ......

येत असावी रे पूर्वेला
सोनेरी पुणिमा
दाहि दिशांना फिरत असावा
झुळझुळु तो वारा !
अेक असावी किलबिल भंवती
नाजुक पक्ष्यांची
साथ असावी आणिक त्याला
तुझिया मुरलीची !
घडा घेवुनी मृण्मय येतां
मी रे यमुनेला
लपुनि बसावें वृक्षावर तूं
वेडी मी राधा !
धुंडुनि धुंडुनि विकल मनानें
जलांत मी जातां
भरतां भरतां घडा दिसावी
त्यांत तुझी प्रतिमा !
खटचाळ हंसणे अधरी पावा
अन् नाजुक भाव
बघतां बघतां विसरुनि जावें
विश्वाचें रूप !!

● ● ●

## अवघडलेली --

खटचाळ रजनी निघुनी गेली
चोर पावलीं आणिक तूं ग
अजुनि आहे स्वप्नामध्यें
रात्रीच्या त्या सुनहारी ग !

डोईखाली हात तुझा अन्
केशभार ग विकल तुझा
सुटली ग कधीं सांग कंचुकी
उरोज आहे अजुनी उघडा !

अवघडलेली किंचित् दिसशी
समाधान परी कसले ग
अवघडलेला कसा विचारूं ?
भीति कोणी पाहील ग ?

• • •

## बदल --

मऊ नाजूक पानाची
सरे कोवळीक आज
रंग गुलाबी तांबूस
झाला हिरवा गडद

आला कोवळ्या फांद्यांत
वांडपणा आपोआप
दाद देईनात आता
वारा करितो बेजार !

पर्णसंभार वाढला
क्षेत्र वाढले विविध
असा जाहला बदल
वृक्ष वडाचा समृद्ध !

आज चिंचेच्या दृष्टीस
जाणवतो तो बदल
लागे गोड हुरहूर
झाल्या वासना आंबट !!

● ● ●

## उदास वासना --

पिचल्या वेळुच्या
मांडवावरती
प्रसन्न पाहुनी
जुईची ही वेली....
    अगाच झुरतो
    पिपळ मनांत
    अुदास वासना
    सळसळतात !

• • •

## राधेला लाज वाटुं दे--

तूं तुझा पदर
अेका खांद्यावर
जरा वेळ असाच घे,
तुझ्या उभार छातीकडे
या डौलदार हंसीला
जरा बघुं दे
तिचा नक्षा
थोडा उतरूं दे !

तूं आज
तुझ्या डोळ्यांत
सुरमा नकोस घालूं
तुझ्या डोळ्यांतील चंचलता
या हरिणीला
जरा बघूं दे
तिच्या अभिमानाला
जरा धाक बसुं दे !

तूं आज
तुझा केशसंभार
असा मोकळाच ठव,
कस्तुरी मृगाला त्याचा
जरा गंध हुंगु दे
त्याच्या कल्पनेला
जरा झटका बसूं दे !

थांब,
मला जरा
तुझी खोडी करूं दे

अन्

मग तूं रागाला ये,
तुझ्या अनुरागाला बघुन
या राधेला लाज वाटुं दे !
या राधेला लाज वाटुं दे !!

• • •

## मांजर काळे --

कधींपासुनी
क्षितिजामागें
दडुनी बसलेले
मांजर काळे ....

संध्याकाळीं
दूध उन्हाचे
निवले बघुनी
लागे चाटाया
लाख जिव्हांनी ...

अन् फस्त करुनी
ते सारे
जावून बसले
भांड्यांतच त्या
सुस्त,
पाय पसरोनी !!

• • •

## भरलेल्या गेहीं--

ढगाळ आकाश
हवा कुंद सुंद
अंधार दाटला
चोहींकडे !

सुचेना रमेना
अशांत हें चित्त
नेटके ते कांहीं
घडेचना !

पाहुनी वाटेस
थकले हे नेत्र
अश्रु नकळत
दाटतात !

भरलेल्या गेहीं
गोपाळ संगतीं
असता कां वाटे
अेकेकटें !

● ● ●

## कळत नकळत

कळत नकळत
तुझ्या अवयवाला
आकारानी
साज दिला
अन्
तुला हंसीचा डौल आला !

कळत नकळत
तुझ्या नेत्रांतील
बालिशता
लुप्त झाली
अन्
तल्वारीची धार आली !

कळत नकळत
तुला
कंठ फुटला
अन्
शब्दाशब्दाला
अवीट गोडी प्राप्त झाली !

कळत नकळत
तुझ्या अुंचीला
अुंची लाभली
अन्
तुझी मूर्ति मूर्त झाली !

कळत नकळत
अघटित
घडलं
अन्
स्वतःलाच तूं
    हरवून बसलीस !!

● ● ●

## अज्ञात वाट --

वाटेनें एकटा
चालतो भकास
कांहीं केल्या वाट
संपेचना !

पदोपदीं मागें
बघतो वळुन
कुणि सोबतीला
येअील का ?

माझेच पावुल
वाजे क्षणोक्षणी
पदरी निराशा
येअी घोर !

अज्ञात ही वाट
तुलाच ठावूक
तूं तर गेलीस
आधीच निघुन !!

● ● ●

## बघतां बघतां

कांठावरती
अुभी राहुनी
पाहत होते
जळ यमुनेचे . . .
काळे गहिरे
क्षितिजाला
भिडणारे
अन्
आकाशाला
भिवविणारे !

बघतां बघतां
अवचित् गेला
तोल वाटला
अन् मी पाहिले
चमकुन मागें . . .
परी बुडाले
फसले मेले
तव नेत्रींच्या
विशाल डोहामध्यें !!

• • •

## भरारी !

क्षितिज होवुनी मला वाटतें
तुज बिलगावें तुज चुंबावें . . .

तुरा होवुनी कधि वृक्षाचा
मला वाटतें तुज झुलवावें !

कळस होवुनी अभिमानानें
मला वाटतें तुज डिवचावें . . .

हिमालयाचे उत्तुंग होवुनि
शृंग वाटतें तुज भेदावें !

विमान होवुनि नव्या युगाचे
मला वाटतें तुज भिववावें . . .

गरुड भरारी घेवुनि वाटे
अनंतांत मी विलीन व्हावें !!

• • •

## तुला पहावें --

श्रावणांतले ऊन लपेटुन
अेकटीच तूं बसली असतां
तुला पहावें न्हालेली तूं
लंपट वस्त्रामधुनी भिजल्या !

० ० ०

चांदण्याचे वस्त्र लपेटून
झिरझिरीत तूं बसली असतां
वासनेचिया गवाक्षांतुनि
तुला पहावें -- व्याकुळ राधा !!

● ● ●

## चाड—

आशेच्या पदरीं
निराशेचा धोंडा
धांव खावोनिया
निढावलो !

सुखदु:खाचे या
नुरले सुतक
आंघोळ करोनी
मुक्त झालो !

कुणासाठीं हसूं
कुणासाठीं रडूं
आपले परके
अुमगेना ?

आजवरी वृथा
विसंबुनी होतो
तुला तरी चाड
असेल गा !

• • •

## फुलली आशा ! —

रखरखलेली
दुपार होती
पडला होता
कधीच वारा
सडक अेकटी
चालत होती
तिला विसांवा
ठावुक नव्हता . . .

अेकटाच मी
विषण्ण होतो
तोच ' कुहुकुहु '
कुठे कोकिळा ?
खोल कुठेतरि
मनांत माझ्या
साद अुमटला –
फुलली आशा !

• • •

…ाठी ग्रंथ सं… ठा… स्थलप्रत
…क्र. वि. ……
…ांक …… नों. दि. ……

## प्रीत —

प्रीत वाऱ्याची
जगावेगळी
दिशादिशांना
बिलगायाची !

प्रीत निर्झराची
खळखळणारी
कुशित नदीच्या
लपावयाची !

प्रीत सागराची
मस्त रुपेरी
बघुनि कौमुदी
नाचायाची !

प्रीत मृगजळाची
विकल मनाची
वाळुत वितळल्या
डुबावयाची !

प्रीत मधुपाची
गुंगायाची
कलिके भंवती
रुंजावयाची !

प्रीत दिवसाची
झिजावयाची
मिठींत रात्रीच्या
निजावयाची !

प्रीत आकाशाची
युगायुगाची
धरणीला
अभिष्ट चिंतायाची ! !

● ● ●

## जगावेगळी !

निळ्या आकाशीं
एक चांदणी
लुकलुकते
तगमगते !

कडे कपारीं
नदी एकटी
खळखळते
हळहळते !

वनीं उपवनीं
कळी अबोली
हिरमुसली
हुरहुरते !

अशी विरहिणी
जगावेगळी
हंसते फुलतें
स्वप्न गुंफते !!

• • •

# उगा लाजली

धमक पीवळा
रंग पाहुनी
तजेल रसरसल्या लिंबाचा...

अुगा लाजली
कर्दळ कवळी
गालावरती चढली लाली !

• • •

## कशासाठीं ?

भरले आकाश
थंडावला वारा
अंधार अंधार
चहूंकडें !

कुठे न गलबला
भयाण शांतता
नि:शब्द नि:शब्द
खिणता !

कुणी न संगतीं
अंतरीं ती भीती
अेकाकी अेकाकी
मार्ग नवा !

थकले हे नेत्र
व्याकुळ हीं गात्रं
तडफडे जीव कशासाठीं ?

• • •

## माथ्यावरती-

अुजाड माळाच्या
माथ्यावरती
खुरटलेल्या
पानांची
मरतुकडी
बाभळ
मधुन डुलते
वाऱ्याच्या
झोतासंगे
जशी शेंडी !!

• • •

## वारा लागला वहाया....

वारा लागला वहाया
वारा पंखांत भरला
पक्षी हवेंत अुडाला !

वारा लागला वहाया
वारा पानांत शिरला
वृक्ष डुलाया लागला !

वारा लागला वहाया
कळी लागली फुलाया
गंध लागला फिराया !

वारा लागला वहाया
वारा अुठवी लाटांना
नदी लागली धांवाया !

वारा लागला वहाया
ढग लागले जमाया
मोर लागला नाचाया !

वारा लागला वहाया
वारा वेळूंत शिरला.
बन लागले गायाला !

वारा लागला वहाया
वारा आणतो चैतन्य
पृथ्वी हंसते गालांत !!

• • •

# तुझ्या स्मृतीचा

तुझ्या
स्मृतीचा
हिरवा
चांफा
अवचित
फुलतो
मनांत
माझ्या !
अन्
वासनेचा
भुजंग
काळा
फणा
काढितो
पुनःपुन्हा !!

• • •

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
ग्रं. क्र. ९३४९३

## अेकच वाट ......

तुझी माझी वाट
एकच आहे
वाट थोडी निरुंद आहे
चालतांना
थोडा धक्का लागेल
अशी बिचकूं नकोस
प्रवासांत सारं माफ आहे !

तुझी माझी वाट
अेकच आहे
वाट कंटाळवाणी आहे
वेळ जायला हवा
कांहींतरी बोलायला पाहिजे
बोलतांना सहज
तुझा हात हातांत घेअीन
अशी घाबरूं नकोस
बोलतांना नकळत हे घडतंच !

तुझी माझी वाट
अेकच आहे
वाटेंत काटे सराटे आहेत
चुकुन तुला एखादा बोचेल
अन् मग मी तुला अलगद अुचलीन
अशी रोखून नको बघुस
प्रवासांत अेकदा हे व्हायलाच हवं !

तुझी माझी वाट
अेकच आहे
प्रवास खूप दूरचा आहे
सोबतीची प्रत्येकाला गरज आहे
अशी वळून मागं बघुं नकोस
मागुन कुणी येतोय् का ??

● ● ●

## माझेपण विसरून जातो –

गंध फुलाचा हुंगत असता
मी माझेंपण विसरुन जातो
स्वतःच होवुन फुल मी नाजुक
फुलतो डुलतों, नाचुं लागतो !

रंग नभाचा बघतां बघतां
मी माझेपण विसरुन जातो
स्वतःच होवुन नितळ निळा नभ
अभिमानानें मिरवुं लागतो !

झुळझुळु वारा वाहत असतां
मी माझेपण विसरुन जातो
स्वतःच होवुन शीतल वारा
भावगीत मी गावुं लागतो !

खळखळणारा निर्झर पाहुन
मी माझेपण विसरुन जातो
स्वतःच होवुन अवखळ निर्झर
निर्भय गाणें गावुं लागतो !

इंद्रधनूचा गोफ पहातां
मी माझेपण विसरुन जातो
स्वतःच होवुन इंद्रधनू मग
त्या रंगानें रंगुन जातो !

स्वतःकडे कधि सहज पाहतां
मी माझेपण विसरुन जातो
स्वतःच होवुन क्षण परमात्मा
आत्मरंगि मी रंगुन जातो !

● ● ●

# मिचकावित मज –

चंद्रावरती अवचित् आला
अेक ढगाचा कपटा काळा
आणि सांवल्या विरुनी गेल्या
प्रकाश सारा लपुनी बसला !

गाफिल होती सारी दुनिया
गाफिल होता खट्याळ वारा
आणि तुझ्या मी बाहूमध्यें
मिचकावित मज होता तारा !!

• • •

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे. शाखा
३४४५८ वि. काव्य
अनुक्रमांक १५८८ नों. दि. २४-२-६२

## सुस्त माळ —

सुस्त माळ पसरला
हात पाय पसरून
मवु अुन्हाचं कोकरूं
अंगावर खेळवीत !
अनिमिष तो नेत्रानं
बघतोय आकाशांत
अेक घार काढतेय्
कधीपासून वर्तुळ !!

• • •

# कधिं कधिं ...

कधि कधि
मी बसते तेथून
दिसते मजला
चुंबित असता
नीळ नभाला
अधिर धरा !

अन् आठवते मज
अधिरे चुंबन
पहिले वहिले
ते...तिथले...तेव्हांचे !!

• • •

## आज --

आज दिवसाची गती
कांहीं केल्या वाढेना
त्याला आपुले पावुल
उचलतां उचलेना !

मणामणाचे दगड
त्याच्या बांधले पायांत
गति मुंगीची तयाला
आणि दूरचा प्रवास !

आज लोपला प्रकाश
गर्द मेघांची नभांत
उगाचच रेंगाळत
रेडे माजलेले सुस्त !

आज वाऱ्याची झुळुक
झाली अदृश्य महाग
कुंद हवेची म्हातारी
बसे पाय पसरुन !

पाना फुलाच्या हौसेला
असे गालबोट आज
त्याचा खुलेनाच रंग
हिरमुसला सुगंध !

पक्षी बसले दडून
घरटयांत कोटरांत
नि प्रकाशाची प्रतीक्षा
त्यांच्या इवल्या डोळयांत !

आज अंधाराच्या पोटीं
लुळा दिवस जन्मला
छाया विषण्ण भकास
जीव भारावला वृथा !!

• • •

## दु:खामध्यें सुख अेक --

दिवसरात्रिच्या क्षितिजामध्यें
धुरकटलेली सांज बिचारी
बसली होती अवगुंठूनी
अन् भीतीनें भेदरलेली !

दिवस चोरटा निघुनी गला
गाफिल बघुनी तिला टाकुनी
वंचित वेडी पहात होती
पुनः पुन्हा परि अवतीं भंवती !

सरली आशा सरले जीवन
काळोखाची मिठी वाढती
दु:खामध्यें सूख एक की
सवत म्हणूनी सोबत पृथ्वी !!

• • •

# गाभाऱ्यांत

गढुळ आकाश
अंधार भयाण
बेभान् वाऱ्याचे
पिसाट नर्तन . . .

विषण्ण मनाच्या
खोल गाभाऱ्यांत
विषण्ण वासना
करती गोंगाट !

• • •

## रोज पहातो --

रोज पहातो
क्षितिजावरती,
अेक चांदणी
या वेळेला
लुकलुकणारी
चमचमणारी
वेड तियेचे
मनात माझ्या !
निळा जांभळा
कधि तांबडा
रंग बदलता
क्षणा क्षणाला
बघतां बघतां
अवचित् होते
दृष्टिआड ती
मी हो बावरा !

लाख चांदण्या
तिच्या सभोंती
परी मनाला
तिचाच चाळा
तीही मजला
खुणावते परि
असहाय्य मी
असे पांगळा !
मला वाटतें
बंध तोडुनी
तिच्या संगतीं
मीहि फुलावें
मला वाटतें
अेकाकी ती
मीच तियेचा
साथी व्हावें !!

• • •

## खंत --

आकाशाच्या मनांतील
खंत कुणाला कळेना
निळी पोकळी भरेना !
व्यथा वाऱ्याची अनाड
अजुनही अुमगेना
धांव त्याची आवरेना !
गूढ नदीचें अबोल
स्वच्छ असून कळेना
गति मुळीच थांबेना !
अुगवत्या दिवसाला
ओढ कशाची कळेना
खंड कधीच पडेना !
धरणीच्या मनांतील
काळेबेरे समजेना
तिची झुरणी थांबेना !
वेड रात्रीला कुणाचे
अेक दिवस चुकेना
तिची करणी कळेना !
माझ्या मलाच कळेना
हेतु जीवनाचा माझ्या
खंत जाळते मनाला !

● ● ●

# कधि अेकांती –

कधि अेकांती
पडता गांठी
नयनांची कुजबुज झाली
प्रीतीची रीति ती खुळी !

कधि चुंबिता
गे पुष्पांना
गालीच्या आली लाली
प्रीतीची मादकता ती !

कधि सेविता
अधर-अमृता
भावांची झाली गर्दी
प्रीतिची गडे ती अुर्मी !

कधि सन्निधीं
दोघें असुनी
देहाची सांगड जडली
प्रीतीची खेळीमेळी !!

• • •

## सरली दौलत मदनाची –

तुझी अन् माझी अवचित् पडली
बांधावर गांठ
कशी मी विसरूं ती भेट ?

गालावरती आधीच लाली
संध्येचा रंग
मिसळला त्यांतच अनुराग !

नयन पाखरें भिरभिर फिरती
दूर घेत वेध
जाहलो क्षणांत मी विद्ध !

विशाल भालावरी शोभती
चंद्राची कोर
लाजतो चवथीचा चंद्र !

ओठ पाकळ्या मधुनी दिसती
जाईच्या ग कळ्या
लागल्या जिवास माझ्या कळा !

वायूसंगे खेळ खेळती
केसांच्या ग बटा
चालला बोटांचा चाळा !

चंचल वाऱ्यावरी चालला
पदर तुझा सांवर
अुघडे पडले ग अुर !

नाजुक बांधा सिंह कटी
अन् नितळ तुझी कांती
सरली दौलत मदनाची !!

• • •

# चालेल ?

तुझ्या
साऱ्या पत्रांची
करीन म्हणतोय्
एक
"पत्र–तुला"
अन्
वांटीन साऱ्या
वंचितांना !
चालेल ?

● ● ●

मराठी ग्रंथ सं… ठा… स्थळप्रत.
अनुक्रम
क्रमांक .......................... नों. दि. ..............

## अर्ध्या रात्रीं--

अर्ध्या रात्रीं
ताऱ्यांना येते पेंग
मिटतात अुघडतात डोळे
क्षणाक्षणाला
आणि बघतात
कुणि पहातय का ?

अर्ध्या रात्रीं
विसरून मतभेद
निजतात क्षितिजाच्या कुशींत
साऱ्या दिशा
होवून एक
आळी मिळी चिप् !

अर्ध्या रात्रीं
वाऱ्याला येतो चेव
अेकच गाणें फिरतो गात
पिसाट
बेबंद बंडाचे
होवुन कलंदर !

अर्ध्या रात्रीं
असह्य होतात वेदना
गर्भवती कळयांना
सुकुमार
आणि सोडतात
अुष्ण अुसासे !

अर्ध्या रात्रीं
रात्रीला येते जाग
आठवून दिवस येणार
दिवस येणार
लागते सांवराया
चांदण्याचं वस्त्र
घाओ घाओनें !!

● ● ●

## उगा हंसतें आकाश

कधि कधि स्वैर वारा
शोभे कळीचा नारद
सांगतो काहीबाहीच
हळुं लाटांच्या कानांत ...

" चला मजसंगे दूर
करूं जगाचा प्रवास
रोज दावितो तुम्हांस
शोभा सुरेख विविध !"

वेड्या लाटांच्या मनांत
फुले स्वातंत्र्याची जिद्द
हातीं गुंफुनिया हात
उग्र निघाल्या गर्जत ...

परि निधड्या छातीचा
रुंद किनारा रांकट
अडवितो पुन:पुन्हां
अन् हंसतो विकट !

हिरमुसल्या त्या लाटा
खिन्न निराश बघुन
उगा हंसते आकाश
छटा ढगाळ गढूळ !!

• • •

## कोडी ......

प्रात:काळीं
तोंडावरची
हळुच धुक्याची
वाकळ सारुन
मस्त मजेनें
शेकतात ही झाडें
पूर्वेच्या वन्ही वरती ...
मुखा मुखावर
रक्त तांबडी लाली !
कोडी गोड गुलाबी !!

• • •

# अैखादा दिवस --

अेखादा दिवस
असा येतो
चटका लावून
निघून जातो !
अेखादी रात्र
अशी येते
भुर्‌कन
अुडुन जाते !
अेखादी लकेर
अशी येते
कानांतच
रुतून बसते !
अेखादी ओवी
अशी असते
ओठावरुन
घसरते !
अेखादा स्पर्श
असा असतो
सतत त्याचा
भास होतो !
अेखादं माणूस
असं असतं
डोळ्यापुढून
हलत नसतं !!

• • •

## अगाचच !

साध्या भोळ्या
गुलछडीच्या
अगाचच
        मनीं शंका . . .
मान अुंचावून बघते
" कुणी पहाते का मला ?"

• • •

## पहांट --

जागी जहाली पहांट
पंख फुटले वाऱ्यास
हलवून जागें केले
त्यानें निजल्या वृक्षांस !

पानांची ती सळसळ
चराचराच्या कानांत
त्यानें घोंगडी अपुली
हळूं सारली बाजूस !

घोंगडींत काळ्याशार
नक्षत्रें बसली लपून
पहांटेचा शुक्र तारा
मात्र कमालीचा धीट !

कांहीं केल्या तो अैकेना
गेली पहांट थकून
पाप रात्रीचे स्मरून
झाली पांढरी फटक ! !

• • •

# जरी कांठ

बोलतां
बोलतां तूं
ओढला
अपुला पदर...
अन्
त्याचा जरीकांठ
रुतें
माझ्या काळजांत !

• • •

# " गीत "

भल्या पहांटे अुठून
फुलांच गीत कधीं अैकलस का ...
धुक्याचा पडदा अलगद सारुन
पाकळ्यांनीं गुणगुणलेलं
सुगंधी–गीत कधीं अैकलस का ?
मध्यरात्रीं अुठून
ताऱ्यांचं गीत कधी अैकलस का ...
निळ्या मखमली प्रांगणांत
लुकलुकत्या तेजाचं
प्रकाश–गीत कधी अैकलस का ?
सायंकाळीं कधीं
अुघड्या रानांत तूं गेलास का...
सहस्त्र करांनी भेटणाऱ्या
बेछूट वाऱ्याचं
बंडखोर–गीत कधीं अैकलस का ?
नितांत अेकांतांत
स्वतःला विसरुन कधीं बसलास का ?
आत्म्याच्या भात्यांतून स्रवणारं
अमर–गीत
तल्लीन होवून कधीं अैकलस का ?

• • •

# पाणवठ्यावर

तुला पहावें पाणवठ्यावर
विरल धुक्याच्या पडद्यामागून . . .
कटि डोईवर घडा तुझ्या अन्
भिजलेली तूं ओलींचिंब !

नजर बावरी भिरभिरणारी
अवखळ हंसणे गालीं अधरीं
मंद मदालस चाल तुझी अन्
अभिमानानें भरली छाती !!

● ● ●

## अेक चित्र !

भिंतीवर अेक चित्र . . .
खळाळणारी यमुना
निःशब्द कांठ
अुन्मन राधा —
खटयाळ कान्हा
झांकतोय् तिचे डोळे आतां !

बघतां बघतां नकळत
मलाच होते बाधा
घामानें मी चिंब होवून
मीच होते राधा ! !

• • •

## काय करूं ?

मावळतीच्या क्षितिजावर
अेक पांढरा ढग
बघून हसतोय्
माझ्या पांढऱ्या केसांना
काय करूं ?

● ● ●

## जावूं कसा ?

अेक चांदणी
डोळे मिचकावून
खुणावतेय् मला
जावूं कसा ?

● ● ●

# माझी मला कविता --

वेड्या मनांत माझ्या
वेडे विचार येती
शब्दांत गुंफतो मी
म्हणतात काव्य कोणी
ठावें न काव्य मजला
माझ्या किती पिढ्यांना
आश्चर्य हो मनाला
म्हणता ‘ कवी ’ कुणाला ?
ठावे न वृत्त--जाती
माझी कवी न वृत्ती
ठावूक ना मला ती
कविता कशास म्हणती ?
नाहींत कल्पनेच्या
माझ्यांत त्या भराऱ्या
जीवनांत रुक्ष माझ्या
येणार त्या कशाला ?

आणूं कुठून सांगा
रस–स्वाद माधुरी ती
माधुर्य जीवनाचे
कळलें मला न अजुनी !
अुदात्त. भव्य कांहीं
सांगूं कसे कुणाला ?
सुचणार का मला ते
मेल्या मनास माझ्या ?
लिहिणार मी असेंच
शब्दांत बोबड्याच
जेव्हां मनांत कांहीं
येअी अुचंबळून !
केली कुणी स्तुती वा
केली जरीहि निंदा
त्याची मला क्षिती ना
माझी मलाच कविता ! !

REFBK-0013493
REFBK-0013493
९३०९३